## ऋ ण नि र्दे श

म॰ बा॰ चितळे लिखित " मनोरमा " आणि अप्पा मार्तंड जोशी लिखित " सौभाग्यरमा " या दोन नाटकांचा सामाजिक आणि वाङ्‌मयीन अभ्यास असंख्य अडथळे पार करता करता पूर्णत्वास आला याचे समाधान वाटते॰ या कामी मला अनेकांनी मार्गदर्शन केले॰ या सर्वांचा ऋणनिर्देश करणे अगत्याचे वाटते॰

प्रस्तुत प्रबंधिकेचे संशोधक मार्गदर्शक गुरुवर्य डॉ॰ ल॰ रा॰ नसिराबादकर यांच्याकडून मला सतत मार्गदर्शन आणि प्रेरणा मिळत राहिली॰ त्यांचे मार्गदर्शन ह्या अभ्यासापुरतेच मर्यादित नसून भावी जीवनातही उपयोगी पडेल असे आहे॰ त्यामुळे त्यांच्या ऋणात राहण्यातच मला आनंद वाटतो॰

मुंबई मराठी ग्रंथसंग्रहातील कर्मचारी वर्ग, करवीर नगर वाचन मंदिर प्रमुख ग्रंथपाल सौ॰ लिमये आणि कर्मचारी वर्ग, बॅ॰ खर्डेकर ग्रंथालय कर्मचारी वर्ग यांनी मला दुर्मिळ ग्रंथ आणि नियतकालिके उपलब्ध करून दिली॰

माझे पति श्री दिलीप ह॰नाखे, मुले चि॰ विशाल व प्राची, आई सौ॰ सरला वि॰ देशपांडे, आत्या सौ॰ मंगला, श्री॰सरजोशी आणि तिचे कुटुंबीय या सर्वांच्या सहकार्यामुळेच ही प्रबंधिका मी पूर्ण करु शकले॰ प्रा॰ कु॰सविता राऊत, प्रा॰ सौ॰ विजया गाट, कु॰ मंजुषा दातार या मैत्रिणींचा हातभार, प्रोत्साहन हे ही महत्त्वाचे आहे॰

माझ्या सासूबाई श्रीमती उषा ·ह ·नाखे यांनीही मला मदत केली·

सांगरूळ शिक्षण संस्थेचे सेक्रेटरी श्री डी· डी· आसगावकर, स·ब· खाडे महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य · बी· के· काटकर यांनी केलेले सहकार्य विशेष उल्लेखनीय आहे· मराठीचे विभाग प्रमुख प्रा· एस्·व्ही· सुतार यांनी या अभ्यासक्रमाच्या सुरवाती-पासून मला मदत केली·

प्रबंधिकेचे टंकलेखन श्री·कदम यांनी चांगल्या त-हेने करून दिले· या सर्वांच्या सहकार्याबद्दल मी आभारी आहे·